# मिरा भाईंदर महानगरपालिका

स्व इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय,
छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प.), ता.जि. ठाणे, 401 101.


स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

जा.क्र.मनपा/आस्था/ 820 /2022-23 दि. 13 / 07 /2022

विषय:- स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव अंतर्गत "हर घर तिरंगा" उपक्रम राबविण्याबाबत.

संदर्भ:- 1. मा. अपर मुख्य सचिव, ग्राम विकास व पंचायत राज विभाग यांचेकडील जा.क्र./स्वा.अ.म-ग्रा.वि./क्षे.अ./2022 प्र.क्र./29, दि.06/07/2022.

2. जा.क्र.मनपा/आस्था/792/2022-23, दि.08/07/2022 रोजीचा आदेशान्वये स्थापन करण्यात आलेली मिरा भाईंदर महानगरपालिका कार्यान्वयन समिती.

**आदेश**

भारताच्या स्वातंत्र्याला 75 वर्षे पूर्ण होत असल्याच्या पार्श्वभूमीवर, जनतेच्या मनात स्वातंत्र्य लढ्याच्या स्मृती तवत रहाव्यात. स्वतंत्र संग्रामातील अज्ञात नायक/क्रांतीकारक/स्वातंत्र्य संग्रामात घडलेल्या विविध घटना यांचे स्मरण व्हावे, तसेच स्वातंत्र्यासाठी चेतवलेले स्फुल्लिंग कायम तेवत रहावे व देशभक्तीची जाज्वल्य भावना कायमस्वरुपी जनमानसात राहावी, या उद्देशाने या दैदिप्यमान इतिहासाचे अभिमानपूर्वक संस्मरण करण्यासाठी दिनांक 11 ऑगस्ट, 2022 ते दिनांक 17 ऑगस्ट,2022 या कालावधीसाठी केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांप्रमाणे "हर घर तिरंगा" हा उपक्रम राबविण्यात येत आहे.

त्याअनुषंगाने संदर्भ क्र.02 अन्वये मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव अंतर्गत "हर घर तिरंगा" उपक्रम राबविणेकरीता महानगरपालिका स्तरावर कार्यान्वयन समिती स्थापन करण्यात आली आहे.

सदर उपक्रमाची अंमलबजावणी करण्याकरीता खालील अधिकाऱ्यांची नेमणूक करण्यात येत आहे.

| अ.क्र. | अधिकाऱ्याचे नाव | कामकाज |
|---|---|---|
| 1. | श्री. संजय दोंदे,<br>सहा.आयुक्त | आवश्यकतेनुसार तिरंगा ध्वज उपलब्ध करून देण्याची कार्यवाही करावी. |
| 2. | श्री. राजकुमार घरत,<br>प्र. जनसंपर्क अधिकारी | "हर घर तिरंगा" उपक्रमाबाबत मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात जनजागृती/प्रसिध्दी करण्याची कार्यवाही करावी. |
| 3. | सर्व सहा.आयुक्त,<br>प्रभाग कार्यालय क्र.01 ते 06 | आपल्या अधिनस्त महानगरपालिका क्षेत्रातील नागरीकांच्या घरावर तसेच सर्व शासकीय/निमशासकीय/ खाजगी आस्थापना/सहकारी संस्था/शैक्षणिक संस्था यांना तिरंगा ध्वजाचे वाटप करण्याची कार्यवाही करावी. |
| 4. | सहा.आयुक्त (कर) | |
| 5. | वैद्यकीय आरोग्य अधिकारी | |

(मारुती गायकवाड)
उप आयुक्त (मुख्यालय)
मिरा भाईंदर महानगरपालिका